# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक सुधारणेतील कार्य एक ऐतिहासिक अभ्यास

**प्रा. डॉ. मृणाल गुलाबराव भोसले** इतिहास विभाग जिजामाता शास्त्र कला महाविद्यालय भेंडा बुद्रुक ता. नेवासा, जि. अहमदनगर

---

**प्रस्तावना :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे थोर विचारवंत, दलित, शोषित, पिडितांचे कैवारी होते. बहुजनात स्वत्वाची जाणीव निर्मान करणारे क्रांतिकारक महापुरूष, समाजसुधारक व थोर शिक्षणतज्ञ होते. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार होते. जातीभेदाचा त्यांना अत्यंत त्रास सहन करावा लागला. त्यातुन त्यांचे व्यक्तीमत्व निर्माण झाले. आयुष्यभर खडतर ज्ञानसाधना करून विधिशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र यात प्रभुत्व संपादन केले दलित, शोषित व पीडित यांच्या सर्वागिण विकासासाठी त्यांनी आपले आयुष्य समर्पित केले. ते पत्रकार, शिक्षणतज्ञ, दलितोध्दारक, प्रज्ञासुर्य, विश्वभुषण होते. त्यांनी लोकशिक्षक या नात्याने अनेक शैक्षणिक कार्य करून आपले शिक्षणविषयक विचार मांडले न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या चार आधारभुत तत्वांचे ते पुरस्कर्ते होते. त्यांनी गौतम वुध्द, संत कविर आणि महात्मा ज्योतिबा फुले यांना गुरू मानले होते. विश्वभुषण, भारतरत्न या सर्वश्रेष्ठ पुरस्काराने ते सन्मानीत झाले आहेत.सामाजिक समतेसाठी विषमतेविरुद्ध आणि सामाजिक न्यायासाठी अन्यायाविरुद्ध युद्ध लढणारे योद्धा म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आपण समजून घेतले पाहिजे. हिंदू समाज हा आरंभी चार वर्णात विभागलेला होता. वर्ण हा माणसाच्या जन्मावर सत्त्वावर आधारलेला होता. पुढे वर्ण हा जातीवर आधारला गेला. चार वर्णाचे रूपांतर चार जातीत झाले. जातिभेद व्यवस्था ही एकाच वंशाच्या लोकांची सामाजिक विभागणी आहे. ती केवळ श्रमाची विभागणी करते असे नाही. ती श्रमिकांची सुद्धा विभागणी करते. एखाद्या मनुष्यास जो धंदा आवडत नाही तो करण्यास ती त्याला भाग पाडते. हिंदू समाजाची चातुर्वर्ण्याची पायावर पुनर्रचना करणे अशक्य नि अपमानकारक आहे. कारण चातुवर्ण्य व्यवस्था ही अशी आहे. की, तिचा अपकर्ष निरनिराळया जाती बनण्यातच होत असतो. चातुर्वर्ज्याच्या नियमाप्रमाणे शुद्राला ज्ञान संपादन करण्यास बंदी आहे. आर्थिक उत्पादनाचा त्याला धंदा करता येत नाही.' डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदू समाजातील वर्णववस्था व जातीव्यवस्था यांचा एकत्रिकरणामुळे निर्माण झालेली विचित्र व्यवस्था याकडे लक्ष वेधले आहे. पाश्चिमात्य राष्ट्रामध्ये संपत्ती, व्यवसाय यावर आधारित वर्गव्यवस्था आहे. त्यामुळे तिथे श्रीमंत, मध्यम, गरीब असा भेद आहे व हीच भेदांची मर्यादा आहे. पण हिंदू समाजात मात्र वर्गभेदाची मर्यादा इथे संपत नाही.

**शोध निबंधाचे उद्देश -**

1) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक कार्याचा अभ्यास करणे.

2) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक योगदानाचा परामर्श घेणे.

डॉ. आंबेडकरांचे हे विचार समाजशास्त्रीयदृष्ट्या आशयपूर्ण तर आहेतच, परंतु वास्तववादीही आहेत. त्यातून नेमकी हिंदूची समाजरचना कळते. त्यातील दोष समजतात आणि कोणते दोष नष्ट करण्याची आवश्यकता आहे याचे ज्ञान होते. तसेच वर्गभेदाला जातीभेद जोडल्यामुळे झालेल्या विचित्र स्तरीकरणाचे स्वरूप समजते.डॉ. आंबेडकरांच्या मते, हिंदू समाज ही अनेक जातीची उतरंड आहे आणि या उतरंडीतील प्रत्येक जात उपजात आपल्या पायरीखाली कोणाची तरी जात आहे. याबाबत खूप असते. आपण कुणाच्या तरी वरच्या पायरीवर आहोत ही एक मानसिकता हिंदू जातीची आहे. ही ही एक एक प्रकारची तटबंदी होय. हिंदू समाजाची ही तटबंदी का निर्माण झाली यासंबंधी त्यांनी दिलेले उदाहरण अत्यंत मार्मिक आणि कठोर आहे. पण त्यामुळेच हिंदू समाज शकलांकित झाला आणि प्रत्येक जातीच्या तुकडयाला गौरव वाटू लागला यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बोट ठेवले आहे. 'ब्राहमण म्हणजे जन्मजात भेदाभेद, उच्चनीचता, पवित्र अपवित्र भावना या वृत्तीवर त्यांनी प्रकाश टाकला आहे. त्यामुळे हिंदू समाजातील वर्गव्यवस्था यांचा विचार समानच केला गेला. म्हणजेच जाती अशा जन्माने श्रेष्ठ तशा गुणांनेही श्रेष्ठ मानल्या गेल्या. तसेच जन्माने कनिष्ठ तशा गुणानेही कनिष्ठ मानल्या गेल्या. म्हणजेच श्रेष्ठ जातीचे श्रेष्ठ गुण व कनिष्ठ जातीचे कनिष्ठ गुण अशी सांगड घातली गेली.' डॉ. आंबेडकरांच्या मते, ब्रिटीशांच्या शिक्षण, सुधारणा, कारखाने आणि विज्ञान यांच्याद्वारे या तटबंदीचा हास सुरू झालेला आणि त्यामुळे हिंदू समाजातील वर्ण व जातीव्यवस्थेत परिवर्तन झाले. त्यामुळे हिंदू समाजाची पूर्वीची घडी बिघडली गेली व ब्राहमणांच्या पोटी गुणहीन शुद्रवृत्तीची संतती आणि शुद्राच्या पोटी गुणवान ब्राहमण वृत्तीची संतती जन्मास येऊ लागली. अशापरी गुणांचा आणि जातींचा प्रत्यक्ष विरोध उत्पन्न झाला. अशा प्रकारच्या विरोधामुळेच पुढे ब्राहमणविरूद्ध चळवळी सुरू केल्या आहेत आणि ब्राहमणांचा अत्यंत द्वेष केला आहे. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ब्राहमण जातीचा द्वेष केलेला त्यांच्या अग्रलेखातून आढळत नाही तर 'ब्राहमण्याच्या कल्पनेचा द्वेष केलेला आहे. कारण 'ब्राहमण्य' म्हणजे विषमता-श्रेष्ठकनिष्ठता, पवित्र अपवित्रता, स्पृश्य-अस्पृश्यता या विषारी भावना बाळगण्याची व पाळण्याची प्रवृत्ती आहे. ती हिंदू समाजातील केवळ 'ब्राहमण्य' जातीतच आहे असे नाही. ती ब्राहमणेत्तरातही आहे. अशी 'ब्राहमण्य' संकल्पना त्यांनी मांडली आहे. ब्राहमण्यातून निर्माण झालेल्या विषमतावादी वर्तनाला आणि तसे वर्तन करणाऱ्याला त्यांचा विरोध आहे. म्हणूनच त्यांनी महाड सत्याग्रहाच्या प्रसंगी ब्राहणेत्तर चळवळीचे नेत्यांनी या सत्याग्रहात कोणत्याही ब्राहमण जातीतील गृहस्थास सामील करून घेऊ नये, घातलेली अट डॉ. आंबेडकरांनी फेटाळून लावली आहे. ते म्हणाले की मी ब्राहमन जातीचा व ब्राहमण लोकांचा द्वेष करीत नाही. तर मी ब्राहमण्याचा द्वेष करतो. भारतातील समाजव्यवस्था सर्वंकष बदलून नवीन व्यवस्था देशाला देण्यासाठी त्यांनी आयुष्यभर कष्ट घेतले.[1]

अस्पृश्यता आणि जातीव्यवस्था यांच्यामुळे निर्माण झालेल्या अंधकारात खितपत पडलेल्या लोकांसाठी क्रांतिसूर्याचा उदय म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवितकार्य होय. फक्त दलित शोषितच नव्हे, तर अखिल मानवतेच्या कल्याणासाठी त्यांनी कार्य केले. त्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाने आणि बहुक्षेत्रीय कार्याने भारतीय माणसाच्या जीवनातील विविध क्षेत्रांसाठी त्यांनी योगदान दिले. माणसाला माणुसकीने वागविले गेले पाहिजे, यासाठी त्यांनी अनेक लढे दिले. सर्वच माणसांना समतेने वागविले पाहिजे, यासाठी त्यांनी आपला विचार संविधानसभेत प्रभावीपणे मांडला. दलित, शोषित, स्त्रिया, शेतकरी, कामगार, भटके विमुक्त, आलुतेदार, बलुतेदार यांच्या हक्कासाठी त्यांनी वेळोवेळी आपल्या बुद्धी कौशल्याचा वापर करून लढा दिला. सामाजिक समतेसाठी, विषमतेविरुद्ध आणि सामाजिक न्यायासाठी, अन्यायाविरुद्ध युद्ध लढणारे योद्धा म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आपण समजून घेतले पाहिजे. अस्पृश्यांना मूलभूत मानवी हक्क नाकारले गेले होते. यासाठी त्यांनी संघर्ष केला. महाडचा सत्याग्र, मनुस्मृती दहन, काळाराम मंदिर सत्याग्रह अशी अनेक लोकचळवळीची आंदोलने बाबासाहेबांनी घडवून आणली. यातून दुहेरी रणनीती राबविली. लोकांना अस्पृश्यतेच्या विरोधात जागे केले आणि इंग्रजी सत्तेला या प्रश्नांची तीव्रता दाखवून देणे हा त्यांचा उद्देश होता. अस्पृश्यांबरोबरच जे जे वंचित आहेत, त्यांनाही त्यांचा हक्क आणि त्यांचे योग्य प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे अशी व्यापक भूमिका त्यांनी घेतलेली दिसून येते. इतिहासातील सर्वात मोठ्या शेतकऱ्यांच्या आंदोलनाचे नेतृत्व डॉ. आंबेडकरांनी केले होते. भारतीय शेतीच्या प्रश्नांवर त्यांचे मूलभूत चिंतन होते. 'भारतातील लहान धारण क्षेत्रे आणि त्यावरील उपाय' या लेखामध्ये त्यांनी शेती प्रश्नासंदर्भात मूलभूत भाष्य केले आहे. शेती हा शासकीय उद्योग असावा, असे त्यांचे मत होते. 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत', 'जनता' आणि 'प्रबुद्ध भारत' अशा वृत्तपत्रांमधून शोषितांच्या न्याय्य हक्कासाठी त्यांनी आवाज उठविला. त्यांची पत्रकारिता परखड व मानवी समाजाला दिशा देणारी ठरली. स्वतंत्र मजूर पक्ष, शेड्यूल्ड कास्ट फेडेरेशन या पक्षांच्या माध्यमातून शोषितांच्या राजकीय अस्तित्वाची लढाई लढली गेली. सर्वसमावेशक अशा लोकसत्ताक तत्त्वावर आधारलेल्या भारतीय रिपब्लिकन पक्षाचे स्वप्न त्यांनी पाहिले होते.[2]

नवभारताच्या उभारणीसाठी स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या तत्त्वांवर आधारित संविधानाचे शिल्पकार म्हणून त्यांनी पार पाडलेली कामगिरी जगाच्या इतिहासात अविस्मरणीय आहे. दोन वर्षे अकरा महिने सतरा दिवस सतत अभ्यास आणि चर्चा करून जगातील उत्तम असे संविधान निर्माण करण्यात आले. त्यामध्ये त्यांचा वाटा सिंहाचा होता, हे कोणालाही नाकारता येणार नाही. हिंदू कोड बिल आणि संविधानातील तरतुदी यांच्या माध्यमातून स्त्रियांच्या हक्कांचे ते उद्गातेच ठरतात. स्त्रियांची गुलामगिरी ही जातीव्यवस्थेशीही निगडीत असल्याचा त्यांचा सिद्धांत अतिशय महत्त्वाचा ठरला आहे. स्त्रियांच्या हक्कांसाठी व ओबीसींच्या हक्कांसाठी कायदेमंत्रिपदाचा राजीनामा देणारा डॉ. आंबेडकरांसारखा नेता विरळाच! डॉ. आंबेडकरांनी अर्थशास्त्रावर मुख्य तीन ग्रंथ लिहिले. 'ॲडमिनिस्ट्रेशन अँड फायनान्स ऑफ ईस्ट इंडिया कंपनी', 'इव्होल्यूशन ऑफ प्रोव्हिन्शियल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया' आणि 'दि प्रॉब्लेम ऑफ रूपी : इटस् ओरिजिन अँड सोल्युशन' हे तीन ग्रंथ त्यांच्या अनुक्रमे एम. ए., पीएच. डी. आणि डॉक्टर ऑफ सायन्स या तीन पदव्यांसाठी लिहिलेले प्रबंध होते. अत्यंत महत्त्वाच्या विषयावर ते लिहिलेले आहेत. 'एनिहिलेशन ऑफ कास्ट'मध्ये जातीचे अर्थशास्त्र; 'व्हॉट काँग्रेस अँड गांधी डिड टू अनटचेबल्स' या ग्रंथामध्ये अस्पृश्यतेचे अर्थकारण, तर 'बुद्धिझम अँड कम्युनिझम' यातील राज्यसंस्था आणि समाजरचना यांचे राजकीय अर्थशास्त्रीय विश्लेषण हे त्यांचे लेखन त्यांनी 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' या स्थायी भावाने केले असले, तरी त्यांचे अर्थशास्त्रीय लेखन हे सर्व देशाला समोर ठेवून व्यापक अर्थाने केल्याचे दिसून येते.[3]

समाजरचना, राज्यसंस्था, शासनव्यवस्था, लोकशाही, कायदे, संविधानशास्त्र, शिक्षण, शेती, कामगार, विद्यार्थी, शिक्षण अशा अनेकविध विषयांवर त्यांनी विपुल लेखन केले आहे. व्याख्याने दिली आहेत. अपरिमित स्वातंत्र्य समतेचा नाश करते. त्यामुळे स्वातंत्र्य अबाधित राखून समता निर्माण केली पाहिजे, असे त्यांना वाटते. हुकूमशाही नाकारणारा शासकीय समाजवाद त्यांना अभिप्रेत होता. 'रक्ताचा एकही थेंब न सांडता मूलभूत परिवर्तन घडविणारी राज्यव्यवस्था म्हणजे लोकशाही' अशी लोकशाहीची व्याख्या डॉ. आंबेडकर यांनी केली आहे. हे त्यांचे लोकशाही विचाराला मूलभूत योगदान होय. समाजकारण, धर्मकारण, राजकारण आणि पत्रकारिता अशा विविध क्षेत्रांमध्ये त्यांनी कार्य केले असले, तरी ते मुळात अर्थतज्ज्ञ होते. त्यांचे समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, इतिहास, वाणिज्य अशा विविध विषयांचे ज्ञान प्रेरणादायक आहे. विधिमंडळ, संविधान सभा, संसद अशा सर्वच सभागृहांत त्यांनी केलेली भाषणे, दिलेले दाखले व स्पष्टीकरण ज्ञानाने ओतप्रोत भरलेले दिसून येतात. डॉ. आंबेडकरांनी जे शिक्षण घेतले, ते फक्त पदव्या मिळवण्यासाठी नाही, तर त्यांनी आपल्या या ज्ञानाचा उपयोग समाजाच्या व्यापक हितासाठी करून दिला. विविध ज्ञानशाखांमध्ये लीलया विहार करणारे डॉ. आंबेडकर प्रत्येक प्रश्नाचे, समस्येचे तार्किक विश्लेषण करताना दिसतात आणि शास्त्रीयदृष्ट्या स्पष्टीकरण करतात. त्यामुळे आपला मुद्दा पटवून देणे आणि सार्वत्रिक हितास्तव तो मान्य करून घेणे त्यांना शक्य झाले. बुद्धीकौशल्याचा आणि त्यांच्या विशाल प्रज्ञेचा प्रत्यय आपल्याला त्यांच्या जीवनकार्यात पदोपदी येतो. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या तत्त्वांवर आधारित समाजाची निर्मिती झाली पाहिजे, यासाठी केलेला अविरत संघर्ष यशस्वी झाला. यामागे जसे त्यांचे अथक परिश्रम होते, तसेच प्रचंड ज्ञानाचे आणि अचाट पांडित्याचे उपयोजन त्यासाठी महत्त्वपूर्ण ठरले. [4]

शिक्षण घेवून तरूणांनी आपल्या शिक्षणाचा उपयोग स्वत: साठी न करता समाजासाठी केला पाहिजे यावर बाबासाहेबांचा भर होता. शिक्षणाने केवळ स्वत:ची आर्थिक स्थिती सुधारली म्हणजे भागले असा संकुचित विचार न करता आपल्या समाजाचा सर्वांगीण उध्दार व्हावा यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. अशा पध्दतीची समाजभिमुखतेची जाणीव नव शिक्षितांना करून देण्यास ते विसरत नाहीत. शिक्षण हे दुधारी तलवारीसारखे आहे. ती कशी चालवायची हे ती वापरणाऱ्यावर अवलंबून असते. शिक्षणाने

चांगलेही करता येते आणि वाईटही करता येते, हे सांगताना बाबासाहेबानी शिकलेल्या माणसापासूनच समाजाला खरा धोका असल्याची भिती व्यक्त केली होती. कारण, सुशिक्षित लोक इतरांना कसे फसवायचे ते अधिक जाणतात म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुशिक्षित लोकांना आपल्या शिक्षणाचा वापर समाजाच्या भल्यासाठी करा आणि समाज विकासाचे स्वप्न साकार करा असे आव्हान केलेले दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षण व्यवस्थेत चारित्र्य आणि विनय याला फार महत्त्व दिले. चारित्र्यहिन व विनयहिन सुशिक्षित माणूस हा पशुपेक्षा भयंकर असतो. जर सुशिक्षित मनुष्याचे शिक्षण गरीब जनतेच्या हितास बाधा आणत असेल तर तो समाजाला शाप ठरतो. म्हणून शिक्षण शाप की वरदान ? या प्रश्नांचे उत्तर त्या व्यक्तीच्या चारित्र्य आणि विनयात दडलेले असते असे ते म्हणतात. शिक्षण संस्थेसंदर्भात आपली भूमिका मांडताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षण संस्थेला एक पवित्र संस्था मानली आहे. शाळा म्हणजे उत्तम नागरिक तयार करण्याचे कारखाने आहेत. या कारखान्याचा जबाबदार घटक जेवढा शहाणा असेल तितका उत्तम माल कारखान्यातून बाहेर पडणार आहे. याची जाणीव ठेवून शिक्षणाचे उदात्त कार्य सुरू ठेवले पाहिजे,अशी त्यांची भूमिका होती. शिक्षकासंदर्भात विचार मांडताना बाबासाहेब म्हणतात, शिक्षण प्रक्रियेचा केंद्रबिंदू हा शिक्षकवर्ग असतो. तो राष्ट्राचा सारथी असतो. म्हणून बुध्दीमान, उदात्त, निपक्ष:पाती थोर मनाचे शिक्षकच राष्ट्राचा स्वाभिमान उंचावत असतात. म्हणून शिक्षकाचे स्थान इतरांपेक्षा उच्च असते. त्याचे भान ठेवल्यास खऱ्या अर्थाने शिक्षणाचा उद्देश सार्थक होईल अशी आशा त्यांनी व्यक्त केलेली दिसून येते.[5]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची शैक्षणिक तळमळ ही त्यांच्या चळवळीच्या प्रत्येक टप्प्यावर दिसून येते. मुंबई विधिमंडळाचे सदस्य असताना प्राथमिक शिक्षण कायद्यावर 1938 साली प्रखर टिका करताना ते म्हणतात. चरखा हा शिक्षणासाठी माध्यम म्हणून मूलोद्योगाचे प्रतीक म्हणून स्विकारल्याने बहुजन समाज शिक्षणापासून वंचित होईल त्यांचा शैक्षणिक दर्जा खालावेल अशी भीती व्यक्त करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी त्यातून शहरी व ग्रामीण विद्यार्थ्यांच्या प्रगतीची दरी रूंदावेल असे म्हटले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 1937 साली स्वतंत्र मजूर पक्षाच्यावतीने निवडणूक जाहीरनाम्यात शैक्षणिक प्रश्नाबाबतचे धोरण मांडले होते. पूर्ण आणि सक्तीचे शिक्षण व तांत्रिक शिक्षण यावर त्यांचा विशेष भर होता. शैक्षणिक दृष्ट्या मागास समाजात सरकारी मदतीने शिष्यवृत्या देण्याचे महत्त्व त्यांनी सांगितले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक चिंतन केजी – टू – पीजी अशा सर्व शिक्षणप्रक्रियेबाबत होते. शिक्षण हाच मानवाच्या प्रगतीचा मूलगाभा आहे असा ठाम विश्वास वारंवार व्यक्त करतानाच वंचित समुदायाच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक गरजा भागविले ही सरकारची प्राथमिक कर्तव्ये आहेत हे त्यांनी स्पष्ट केले होते. आजच्या शिक्षणपध्दतीतील खाजगीकरण, विनाअनुदान अल्प मानधन, वशिलेबाजी, भ्रष्टाचार, चारित्र्यहीनता, वेठबिगारी, शिक्षण व शिक्षकांच्या बाबतीत असलेली सरकारची उदासिन धोरणे पाहता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार व कार्य दीपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराला, कार्याला आदर्श माणूस अनुसूचित जातीमध्ये आमुलाग्र परिवर्तन झाले आहे. अज्ञान, अंधश्रद्धा, अनिष्ट प्रथा, परंपरा, जातीय धार्मिक निर्बंध नष्ट करून दलित वर्गाच्या विकासाकरिता शिक्षण आवश्यक आहे. आपण उपाशी अर्धउपाशी राऊन वाटेल तो त्याग करावा लागला तरी करू परंतु मुला-मुलींना शिक्षण देऊ, शिक्षणच विकासाचा मार्ग आहे. शिक्षणामुळे रोजगार, नोकरी व इतर व्यवसायात प्रवेश झाला. ज्ञानाची वाढ, संस्कारक्षम जीवन पद्धतीचा अवलंब करता येईल. वर्तमान परिस्थितीत दलित वर्गातील लोकांचे शिक्षणाचे प्रमाण वाढले असले तरी एकूण लोकसंख्येच्या तुलनेत निरक्षतेचे प्रमाण आजही बरेच आहे. काहीना रोजगार व नोकरी मिळाली म्हणजे सर्वाचा विकास झाला असे होत नाही. त्यामुळे त्यांची गरिबी, हालाकीची परिस्थिती लक्षात घेता शासनाला कृती आराखडा तयार करावा ज्यामुळे अनुसूचित जातीचा सर्वांगिण विकास होऊन मुख्य प्रवाहात येण्यास मदत होईल.[6]

**संदर्भ ग्रंथसुची-**


1) धनंजय कीर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, 2009 पृष्ठ 146.

2) प्रा. सुरेश भारद्वाज, आधुनिक भारताचा इतिहास, लक्ष्मीनारायण प्रकाशन आगरा, 2012 पृष्ठ 146.

3) प्रा.शांता कोठेकर, सुमन वैद्य, आधुनिक भारताचा इतिहास, साईनाथ प्रकाशन नागपुर, 2010 पृष्ठ 198.

4) प्रा. अनिल सुर्या , डॉ. बाबसाहेब आंबेडकर, प्रियदर्शी प्रकाशन कोल्हापूर, 2004 पृष्ठ 86.

5) प्रा. किशारे गव्हाने आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, कैलास पब्लिकेशन, 2014 पृष्ठ 144.

6) प्रा. मोरे शेशेराव, डॉं बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक धोरण एक अभ्यास, राजहंस प्रकाशन पुणे, 2009 पृष्ठ 54.